8 NOV 2017
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधनातून प्रगती शक्य

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भविष्यात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाच्या माध्यमातून प्रगती साधता येईल. तरुण संशोधकांना या परिषदेच्या माध्यमातून संशोधनाची नवी संधी उपलब्ध करून देता येईल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयातर्फे आयोजित दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कर्नाटकचे माजी खासदार अमरसिंह पाटील होते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि माऊस क्लिकद्वारे परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी केले. शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच आयसीआयआरएसटी परिषदेच्या गौरव अंकाचे प्रकाशन करण्यात आले.



**कोल्हापूर : गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अमरसिंह पाटील, डॉ. जिन व्हयूक किम, प्रा. जयकुमार देसाई, डॉ. मंजिरी देसाई-मोरे, दौलतराव देसाई, शिवानी देसाई यांच्यासह अन्य मान्यवर.**

गोखले महाविद्यालय, नॉलेज पार्टनर सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च, डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ बायो टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि विश्वशांती मल्टीपर्पज सोसायटी यांच्या सहकार्याने या परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. जिन व्हयूक किम (दक्षिण कोरिया), डॉ. डी. पी. डुबल (ऑस्ट्रेलिया), डॉ. सी. डी. लोखंडे (डॉ. डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी), डॉ. शीतल वाटीले (यवतमाळ), डॉ. आशीष लांबट, डॉ. अतुल बोबडे (नागपूर), डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. ज्योती जाधव (शिवाजी विद्यापीठ) आदी उपस्थित होते.

शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा शिवानी देसाई, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलतराव देसाई, कौन्सिल मेंबर प्रा. पी. के. पाटील, प्रा. व्ही. डी. मोहिते, बाळ डेळेकर, सुनील पसाले, चंद्रकांत धामणे, डॉ. पी. एस. पाटील, प्राचार्य डॉ. विलास देऊळकर, अजित मोरे, गोखले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी आदींसह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. पी. बी. झावरे, डॉ. पी. डी. आवटे यांनी केले. आभार समन्वयक डॉ. ए. एन. बसुगडे यांनी मानले.

8 NOV 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांनी समाजोपयोगी संशोधन करण्याची गरज

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के: 'विज्ञान व तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधन' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आंतरराष्ट्रीय परिषदांमधून ज्ञानाची देवाण-घेवाण होत असते.भारत महासत्ता करण्यासाठी तरुणांनी समाजोपयोगी संशोधन करण्याची गरज आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

गोखले कॉलेज, नॉलेज पार्टनर सेंटर फॉर इंटरडिसीप्लीनरी रिसर्च, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी आणि शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने गोखले कॉलेज येथील आयोजित 'विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. माजी खासदार अमरसिंह पाटील अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : 'विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन' विषयावरील आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत माजी खासदार अमरसिंह पाटील, डॉ. जिन क्ह्युक किम, डॉ. शीतल वाटीळे, प्रा. जयकुमार देसाई.**

डॉ. शिर्के म्हणाले, जागतिकीकरणात प्रत्येक क्षेत्रातील व्यवहार ऑनलाईन होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस तंत्रज्ञानात नवनवीन प्रगती होताना दिसते. तरूणांनी संशोधनाअंती देशाला प्रगतीपथावर नेणाऱ्या तंत्रज्ञानाची निर्मिती केली पाहिजे. माजी खासदार अमरसिंह पाटील म्हणाले, समाजाला बदलणाऱ्या नवीन विचार प्रणालीला तंत्रज्ञान व संशोधनाची जोड हवी. शास्त्रज्ञानी देशाच्या प्रगतीसाठी अनेक शोध लावल्यामुळे मानवाची प्रगती होत आहे.

डॉ. अतूल बोडके यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी महाविद्यालयाच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी चोन्नम नॅशनल विद्यापीठाचे प्रो. डॉ. जीम. हाईक किम, प्रो. डॉ. जे. जीन. शीम, प्रो. डॉ. दीपक दुबल, प्रो. डॉ. टी. पी. गुजर, डॉ. ज्योती जाधव, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. आशिष लांबट, डी. शीतल बोबडे, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, शिवानी देसाई, प्रा. जयकुमार देसाई, दौलतराव देसाई आदी उपस्थित होते.

8 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विज्ञान, तंत्रज्ञानातूनच प्रगती

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

**प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन**

'विज्ञान व तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण संशोधनासारख्या विषयांवरील आंतरराष्ट्रीय परिषदांमधून ज्ञानाचे आदान-प्रदान करता येते. भूतलावर सर्वव्यापी असे ज्ञानच आहे, जे आपणास प्रगतीकडे नेते. भविष्यात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाच्या माध्यमातून प्रगती साधता येईल. यासाठी अशा आंतरराष्ट्रीय परिषदांची आवश्यकता आहे. त्यातून तरुण संशोधकांना संशोधनाची संधी उपलब्ध होईल', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. डी. शिर्के यांनी केले.

गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, नॉलेज पार्टनर सेंटर फॉर इंटरडिसिप्लिनरी रिसर्च, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी, शिवाजी विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नागपूरच्या विश्वशांती मल्टीपर्पज सोसायटीच्या सहकार्याने 'विज्ञान व तंत्रज्ञानामधील नाविन्यपूर्ण संशोधन' विषयावरील आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार अमरसिंह पाटील होते.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'आंतरराष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून जगातील विविध संशोधनाची माहिती मिळते. असे संशोधन समाजोपयोगी ठरवण्याची संधी मिळते. विज्ञान, तंत्रज्ञानामध्ये वेगाने बदल होत आहेत. या बदलांची माहिती आणि त्याच्याशी समरस होण्यासाठी परिषदांचे महत्त्व अन्यनसाधारण आहे. परिषदांच्या माध्यमातून समोर आलेले संशोधन देशाच्या प्रगतीसाठी नेहमीच साह्यभूत ठरले आहे.'

अध्यक्षीय भाषणात माजी खासदार पाटील म्हणाले, 'नवीन विचारप्रणाली समाजाला बदलत आहे. या विचारप्रणालीला तंत्रज्ञानाची व संशोधनाची साथ हवी. संशोधकांनी अनेक शोध लावले. विज्ञान व तंत्रज्ञानातील शोधांमुळे मानवी जीवन बदलत आहे. पण ते स्वत: निसर्गामुळे प्रेरित आहे. निसर्ग आणि तंत्रज्ञानाचा अप्रतिम मिलाफ आहे.'

यावेळी डॉ. अतुल बोडके यांनी मनोगत व्यक्त केले. उद्घाटंन समारंभास प्रा. डॉ. जीन व्ह्यूक किम, डॉ. डी. पी. डुबल, डॉ. सी. डी. लोखंडे, डॉ. शीतल वाटीले, डॉ. आशीष लांबट, डॉ. अंतुल बोबडे, प्रा. डॉ. ज्योती जाधव, शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, अध्यक्षा शिवानी देसाई, प्राचार्य डॉ. ए. बी. गडकरी, उपाध्यक्ष शिवाजीराव सावंत, दौलतराव देसाई आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी स्वागत केले. प्रा. पी. बी. झावरे, प्रा. डॉ. पी. डी. आवटे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. एन. बसुगडे यांनी आभार मानले.

8 NOV 2017 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'टेक्नॉलॉजी'ची सल्लागार संस्था म्हणून निवड

## केंद्रीय उपक्रम : हिमाचल प्रदेशातील अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी काम करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राम योजनेच्या टीईक्यूआयपी-३ या उपक्रमांतर्गत इन्स्टिट्यूटची मार्गदर्शक संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीची निवड झाली आहे. हिमाचल प्रदेशमधील कांग्रा येथील राजीव गांधी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांवर सल्लागार संस्था म्हणून विद्यापीठातील टेक्नॉलॉजी डिपार्टमेंट काम पाहणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचा २०१३ या वर्षी टेक्निकल एज्युकेशन क्वालिटी इम्प्रूव्हमेंट प्रोग्राममध्ये समावेश केला होता. याअंतर्गत टीईक्यूआयपी - ३ मधील इन्स्टिट्यूटची मार्गदर्शक संस्था म्हणून डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीची निवड झाली आहे. याबाबतचे पत्र 'एनपीआययू'कडून प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारचा तांत्रिक शिक्षण गुणवत्ता सुधारणा कार्यक्रम (टीईक्यूआयपी) उत्तर-पूर्व राज्यासाठी मार्गदर्शक म्हणून काम करील. या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांचे सॉफ्ट कौशल्य विकास आणि औद्योगिक गरजांनुसार राज्य-खासगी क्षेत्रातील सल्लागार गट तयार करण्यात मदत होईल. हा प्रकल्प चालू वर्षात सुरु करण्यात येईल.

पत्रकार परिषदेस विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी ए. बी. चौगुले, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी तसेच टीईक्यूआयपी फेज ३ चे समन्वयक श्रीकांत भोसले, आदी उपस्थित होते.

### प्रकल्पातील प्रमुख परिणाम

- मान्यताप्राप्ततेनुसार, शैक्षणिक निकषांनुसार, फॅकल्टी पदांवर भरती करणे, उत्तम शिक्षण पद्धतीमधील प्रशिक्षण विद्याशाखा, केंद्रशासित प्रदेशांत संस्थेमध्ये सुधारित संशोधन आदानप्रदान.
- सुधारित आर्थिक / शैक्षणिक स्वायत्तता असलेल्या संस्थांचे उत्तम प्रशासन.
- विद्यार्थी शिक्षण आकलनासाठी उत्तम प्रणाली, उच्च संक्रमण दर
- डायरेक्ट फंड ट्रान्स्फर (डीएफटी) सिस्टीमच्या माध्यमाने संस्थांना निधी आणि पारदर्शी रीलिझन्स.
- अंदाजे २०० सरकारी / सरकारी अनुदानित अभियांत्रिकी संस्था आणि संलग्न वित्तीय विद्यापीठ (एटीयू), ज्यामध्ये केंद्रशासित निधीधारित तांत्रिक संस्था (सीएफटीआय) समाविष्ट असतील.
- प्रकल्प केंद्र / केंद्रशासित प्रदेशांकडून सर्व सरकारी / सरकारी अनुदानित अभियांत्रिकी संस्था, एटीयू आणि सीएफटीआय यांचा समावेश असेल.


8 NOV 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १९ कॉलेजना 'अ' मानांकन

## आता आव्हान नव्या 'नॅक' मूल्यांकन पद्धतीचे

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक दर्जा उंचावत आहे. वर्षभरात विद्यापीठातील १९ कॉलेजना नॅकचे 'अ' मानांकन मिळाले. दर्जेदार आणि सोयीनियुक्त शैक्षणिक पद्धतीचे प्रमाणपत्र देणाऱ्या 'नॅक'कडून होणारा गौरव हा नक्कीच शैक्षणिक दर्जा सुधारत असल्याचे द्योतक आहे. मात्र, आता नॅकच्या नव्या मूल्यांकन पद्धतीचे सर्वच कॉलेजसमोर आव्हान आहे.

नॅशनल असेसमेंट ॲण्ड ॲक्रिटेशन कौन्सिल (राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद)



तर्फे प्रत्येक कॉलेजचे मूल्यांकन होते. शैक्षणिक सुविधा, दर्जेदार शिक्षणासाठी होणारे प्रयत्न, उपलब्ध जागा, विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सोयी-सुविधा, प्रशिक्षित शिक्षक वर्ग यासह इतर मुद्यांचे मूल्यांकन

पान २ वर »

### स्वागतार्ह निर्णय : प्रा. डॉ. कामत

नॅकच्या नवीन पद्धतीत वस्तुनिष्ठ आणि अंतर्गत परीक्षण होणार आहे. त्यामुळे बाह्यरंगरंगोटीवर ग्रेड मिळणार नाही. ऑनलाईन डाटा आणि प्रत्यक्ष भेटी यांचा विचार होऊनच ग्रेड मिळेल. यातून वस्तुनिष्ठ आणि दर्जा कळण्यास मदत होईल. खरे मूल्यांकन होणार आहे. हा निर्णय नक्कीच स्वागतार्ह आहे, असे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता अभिकक्षचे संचालक प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले.

# १९ कॉलेजना 'अ' मानांकन

» पान १ वरून

ही समिती करते. त्यानंतर संबंधित कॉलेजचा दर्जा ठरविला जातो. यात शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील १९ कॉलेजना 'अ' दर्जा मिळाला. त्यांच्याकडे असलेले शिक्षण आणि त्याचा दर्जा उत्कृष्ट असल्याचे प्रमाणपत्र दिले. नव्या पद्धतीत ऑनलाईन आणि विद्यार्थ्यांचे समाधान महत्त्वाचे ठरणार आहे.

**मूल्यांकन विद्यार्थ्यांच्या हाती...**

नवीन पद्धतीने होणारे नॅकचे मूल्यांकन काही प्रमाणात विद्यार्थ्यांच्या हाती असणार आहे. साधारण दहा टक्के विद्यार्थ्यांच्या मोबाइलवर नॅकची लिंक येईल. त्याचा संदर्भ घेऊनच संबंधित कॉलेजचा दर्जा ठरविला जाईल. या नवीन पद्धतीसाठी ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ऑनलाईन ॲप्लिकेशन दाखल करण्याची मुदत आहे.

### रंगरंगोटीवर दर्जा नाही

**कॉलेजचे मूल्यांकन 'नॅक'चे तज्ज्ञ प्रत्यक्षात भेट देऊन करत होते. मात्र या प्रक्रियेवर टीका झाली. अनेक कॉलेजच्या रंगरंगोटी, इन्फास्ट्रक्चरवर हे मूल्यांकन काही प्रमाणात अवलंबून होते. आता त्याचे स्वरूपच बदलले आहे. नव्या रचनेत विद्यार्थी संख्या, पब्लिकेशन, अभ्यासक्रमाची रचना, बदललेले अभ्यासक्रम, बाजारातील व्यवहारांशी संबंधित अभ्यासक्रम यांची माहिती ऑनलाईन घेतली जाईल. त्याला ७० टक्के गुण असतील आणि प्रत्यक्ष भेटी देऊन झालेल्या मूल्यांकनाला ३० टक्के गुण असतील.**

8 NOV 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तीस सदस्य बिनविरोध

## अभ्यास मंडळ; सिनेटसह अधिकार मंडळातील बारा जागा रिक्त

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील सिनेट आणि अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी बारा जागांसाठी योग्य उमेदवारच मिळाले नाहीत. त्यामुळे सिनेटमध्ये तीन, अकॅडमिक कौन्सिलमध्ये (शिक्षक) दोन तर सात अभ्यास मंडळांच्या जागाच रिक्त राहणार आहेत.

दरम्यान, अकरा अभ्यास मंडळांसाठी ३० प्राध्यापकांची बिनविरोध निवड झाली. यात विद्यापीठ विकास आघाडी आणि शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) उमेदवारांचा समावेश आहे. निवडणूक बिनविरोध झालेल्या अभ्यास मंडळांमध्ये मानसशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अकाउंटन्सी, फार्मसी, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, सिव्हील इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, संख्याशास्त्र आणि फॅकल्टी ऑफ इंटर डिसिप्लनरी अंतर्गत शिक्षण यांचा समावेश आहे.

दरम्यान, सिनेटमधील प्राचार्य गटातील एसटी प्रवर्गातील जागेसाठी तिन्ही जिल्ह्यांतून उमेदवार मिळाला नाही. त्यामुळे प्राचार्यांच्या दहापैकी एक जागा रिक्त राहणार आहे. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून विद्यार्थी मंडळातील दोघा सदस्यांना प्रतिनिधीत्व मिळणार होते. मात्र विद्यार्थी मंडळाची निवडणूकच न


### दृष्टिक्षेपात निवडणूक

| गट | जागा | उमेदवार |
|---|---|---|
| शिक्षक गट | १० | २८ |
| पदव्युत्तर शिक्षक | ३ | ९ |
| पदवीधर | ९ | ३० |
| अकॅडमीक कौन्सिल शिक्षक | ५ | १० |
| प्राचार्य गट डीटीएनटी | १ | २ |

| गट | मतदार |
|---|---|
| प्राचार्य गट | १३४ |
| कॉलेज शिक्षक (प्राध्यापक १० जागा) | ३३६६ |
| पदव्युत्तर शिक्षक ( विद्यापीठ ३ जागा) | १९७ |
| नोंदणीकृत पदवीधर (१०पैकी ९ जागा) | १४१७२ |
| अभ्यास मंडळे (विभागप्रमुख मतदार) | ८५५ |
| संस्था प्रतिनिधी गट (सहा जागा बिनविरोध) | १२७ |

### अभ्यास मंडळांचा कोरमही अपूर्ण

विद्यापीठात अभ्यास मंडळांना अनन्य साधारण महत्व असते. अभ्यास मंडळांच्या शिफारसीनुसार अभ्यासक्रमांची निश्चिती होते. अभ्यास मंडळात तज्ज्ञ प्राध्यापकांचा समावेश असावा असा प्रयत्न असतो. विद्यापीठाच्या ३३ विभागांतून



प्रत्येक विषयासाठी अभ्यास मंडळ आकाराला येते. मात्र बायोमेट्रिक केमिस्ट्री अँड बायोटेक्नॉलॉजी, कम्प्युटर सायन्स-इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, इतर भाषा, लॉ विभाग, शारीरिक शिक्षणशास्त्र, होम सायन्स आणि जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन या अभ्यास मंडळातील प्रत्येकी एक असे सात उमेदवारच न मिळाल्याने या जागा रिक्त राहिल्या आहेत.

झाल्यामुळे या दोन्ही जागा रिक्त राहतील. अकॅडमीक कौन्सिलवर शिक्षक गटातून निवडण्यात येणाऱ्या एसटी आणि ओबीसी प्रवर्गासाठी उमेदवार न मिळाल्याने या जागेसाठी निवडणूकच होणार नाही. यामध्ये अकॅडमीक कौन्सिलमधील आठ शिक्षक निवडण्यांची प्रक्रिया पूर्ण क्षमतेने होणार नाही.

### कर्मचारी संघाचा आक्षेप

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेत उमेदवारी अर्ज माघारी नंतर अपिल करण्याची कार्यवाही बेकायदेशीर असल्याची टीका शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघांचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव मगदूम यांनी केली आहे. मगदूम यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, 'ग्रामपंचायत निवडणुकांपासून लोकसभेच्या निवडणुकीमध्ये निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज छाननी नंतर अपिल करण्याची पध्दत आहे. उमेदवारी अर्ज माघारीनंतर वैद्य उमेदवारांची यादी जाहीर होते. मात्र, विद्यापीठाने राबविलेली उमेदवारी अर्ज माघारीनंतर अपिलाची पद्धत बेकायदेशीर आहे.'

### अभ्यास मंडळावर बिनविरोध

मानसशास्त्र अभ्यास मंडळ-प्रा. प्रकाश धारुरे, प्रा. भारत नाईक, प्रा. अरुण शिंदे. समाजशास्त्र - प्रा. अरुण जाधव, प्रा. अरुण पौडमल, प्रा. मच्छिंद्र सकटे. राज्यशास्त्र-प्रा. अनिता कणेगावकर, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. शिरीषकुमार पवार. अकाउंटन्सी - प्रा. गुरुनाथ पगारे, विजय माने, प्रा. अशोक शिंदे. फार्मसी - मनीष भाटिया, नीला भाटिया, नामदेव जाधव. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी - प्रा. नितीन सावगावे. मेकॅनिकल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी - प्रा. सुरेश पाटील, प्रा. धनंजय ठोंबरे, प्रा. अमोल तोडकर. सिव्हील इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी - प्रा. सोमेश्वर आर्विकर, प्रा. गिरीष मालू. इलेक्ट्रॉनिक्स सायन्स इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी - प्रा. सुरेश कुंभार, प्रा. प्रशांत शहा, प्रा. अख्तर शेख. संख्याशास्त्र - प्रा. भाऊसाहेब कोरे, प्रा. रमेश कुंभार, प्रा. किरण पोतदार. फॅकल्टी ऑफ इंटर डिसीप्लनरी अंतर्गत शिक्षण - प्रा. बजरंग घाटगे, प्रा. विकास पराजंपे आणि प्रा. सहदेव पुजारी.